# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेसनोट क्रमांक २८८/२०२४ दिनांक- ०७/०८/२०२४.

## Credit card द्वारे ऑनलाईन झालेली ८९,९९८/- रक्कम तक्रारदार यांना परत करण्यात सायबर पोलीस ठाण्यास यश !!

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील काशिगांव परीसरात राहणा-या श्री.दुबे त्यांचे मोबाईलवर क्रेडिट कार्डाचे रिडीम पॉईंट खात्यात जमा करण्याकरीता मॅसेजद्वारे लिंक प्राप्त झाली. लिंकवर तक्रारदार यांनी क्लिक केले असता त्यांचे मोबाईलमध्ये एक अनोळखी ॲप डाऊनलोड झाले व त्यानंतर त्यांचे क्रेडिट कार्डाचे खात्यातुन ८९,९९८/- रु कपात झाल्याचा मॅसेज प्राप्त झाला. तक्रारदार यांचे फसवणुकीबाबत सायबर पोलीस ठाणे येथे तक्रार प्राप्त झाल्याने सदरबाबत नोंद घेण्यात आली.

**(सायबर पोलीस ठाणे आवक अर्ज क्रमांक – १६०५ -बी/२०२४ दि. १७/०७/२०२४)**

नमूद तक्रारीबाबत तात्काळ दखल घेवून तक्रारदार यांचे झाले व्यवहाराबाबत माहिती प्राप्त करण्यात आली. प्राप्त माहितीचे अवलोकन केले असता तक्रारदार यांची रक्कम ऑनलाईन पेमेंट गेटवेच्या माध्यमातुन पुढे वळती झाल्याचे दिसुन आले. त्यावर संबंधीतांना तात्काळ पत्रव्यवहार करुन तक्रारदार यांची रक्कम गोठवुन त्याचे खात्यात परत करण्याबाबत कळविण्यात आले. अश्याप्रकारे तक्रारदार यांचे तक्रारीबाबत तात्काळ पाठपुरावा करुन **फसवणुक झालेली ८९,९९८/- रु रक्कम खात्यात परत करण्यात आलेली आहे.**

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- क्रेडीट कार्ड, डेबिट कार्डद्वारे फसवणूक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.
- अनोळखी लिंक प्राप्त झाल्यास त्या अनुषंगाने कोणतीही कारवाई करुन नये.
- मोबाईलमध्ये कोणतेही अनोळखी ॲप्लीकेशन डाऊनलोड करू नये, तसेच आपले मोबाईलमधील ॲप्लीकेशनची पडताळणी करावी.
- बँकेकडून बँक खातेधारकाला कोणतीही वैयक्तीक माहिती (KYC करीता) विचारली जात नाही.
- आपले बँक खाते, जन्मदिनांक, OTP वा इतर वैयक्तीक माहीती देवू नये.
- फसव्या एमएसएसला,कॉल प्रतिसाद देवू नका.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, सपोनि/स्वप्नील वाव्हळ, पोउनि/प्रसाद शेनोळकर, मपोअं/सुवर्णा माळी, पोअं/राहुल बन, पोअं/विलास खाटीक, पोअं/शुभम कांबळे, मपोहवा/माधुरी धिंडे, यांनी पार पाडली आहे.

**सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांक :- १९३०**

**सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईट :- www.cybercrime.gov.in**

--------oooo--------